|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
उमवि नगर, जळगाव ४२५००१ फोन 0257-2257276, 2257277 फोन 0257-2258403, 406,
Umavinagar, Jalgaon Tel Nos. : 0257-2257276 to 2257277, Fax Nos.:0257-2258403, 406
Web : www.nmu.ac.in E-mail : registrar@nmu.ac.in & dr-approval@nmu.ac.in

जा.क्र.कबचौउमवि/१३/ १६५ /२०२५ दि. २४/११/२०२५

**प्रती,**
**कबचौउमवि, जळगाव या विद्यापीठाशी संलग्नित असलेले अनुदानित,**
**विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित महाविद्यालयांचे**
**मा. प्राचार्य व परिसंस्थांचे मा. संचालक यांना,**

विषय:-अनुदानित खाजगी शाळा व महाविद्यालयातील सेवेतील कार्यरत कर्मचारी यांना उच्च शिक्षण घेण्याकरीता विद्यापीठे व शैक्षणीक संस्था प्रमुखांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ अन्वये कार्यवाही बंधनकारक करण्याबाबत.

संदर्भ:- मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग,जळगाव यांचे दि.०५.११.२०२५ रोजीचा ई-मेल.

महोदय/महोदया,

मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग,जळगाव यांचा दि.०५.११.२०२५ रोजीचा ई-मेलव्दारे विद्यापीठास व सर्व अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य,विधी,शिक्षणशास्त्र, समाजकार्य महाविद्यालये, जळगाव, धुळे, नंदुरबार यांना पत्र व पत्रासोबत मा. आमदार सुधाकर आडबाले, विधान परिषद सदस्य यांना दि.१८.०५.२०२५ रोजीच्या निवेदनाची प्रत पाठविण्यात आलेली आहे.

तसेच वरील निवेदनानुसार आणि उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कळविल्यानुसार महाविद्यालयामधील कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना उच्च शिक्षण घेणेसाठी किंवा त्यांची शैक्षणीक पात्रता वाढविण्यासाठी प्रयत्न करीत असतात.तसेच सदरहू शिक्षण घेतांना संबंधीत कर्मचारी यांनी त्यांचे दैनंदिन मुळ कामावर परिणाम होणार नाही याची दक्षता घेण्याचे अटीवर शैक्षणीक संस्थांनी संबंधीत कर्मचारी यांना शिक्षण घेण्यासाठी परवानगी देण्याबाबत सुचना निर्गमित करण्याविषयी कळविले आहे.

करिता, या पत्रासोबत मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग,जळगाव यांचे कडील दि.०५.११.२०२५ रोजीचे पत्राची आणि मा. आमदार सुधाकर आडबाले, विधान परिषद सदस्य यांचे दि.१८.०५.२०२५ रोजीच्या निवेदनाची प्रत आपल्यास्तरावर यथायोग्यत्या पुढील कार्यवाहीसाठी पाठवित आहोत.

कळावे.

आपला विश्वासू,
सहा. कुलसचिव
(मागासवर्गकक्ष)

सोबत:- वरील प्रमाणे

# महाराष्ट्र शासन
## सहसंचालक, उच्च शिक्षण जळगाव विभाग जळगाव
## ग्राहक न्यायालयाच्या मागे, आकाशवाणी केंद्राजवळ, जळगाव

दुरध्वनी व फॅक्स- (०२५७-२२३८५१०) Email:- jdhe_jal@yahoo.co.in

E-Comp. No.: २३११७८३

File No.: JDJAL-१३०११(१६)/४४१/२०२५-JDHEJAL-G I AID EST

ई-मेलद्वारे

प्रति,

कुलसचिव,
कवयित्री बहिणाबाई चौधरी,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव

प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र,
समाजकार्य महाविद्यालये,जळगाव, धुळे, नंदूरबार

**विषय:- अनुदानित खाजगी शाळा व महाविद्यालयातील सेवेतील कार्यरत कर्मचारी यांना उच्च शिक्षण घेण्याकरीता सर्व विद्यापीठे व शैक्षणिक संस्था प्रमुखांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 अन्वये कार्यवाही बंधनकारक करण्याबाबत.**

**संदर्भ:**-मा.संचालनालयाचे पत्र क्रमांक-उशिस/संकीर्ण/२०२५/मवि-१/ई.२०६६७१७, दि.१३.०८.२०२५

उपरोक्त विषयाबाबत मा.आमदार सुधाकर आडबाले, विधान परिषद सदस्य, यांच्या दि.18.5.2025 रोजीच्या निवेदनाची प्रत तसेच संदर्भिय पत्राची प्रत सोबत जोडली आहे. कृपया अवलोकन करावे.

सदर निवेदनानुसार, अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील कार्यरत शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचारी यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी किंवा त्यांची शैक्षणिक पात्रता वाढविण्यासाठी प्रयत्न करत असतात. सदरहू उच्च शिक्षण घेत असताना संबंधित कर्मचारी यांनी त्यांचे दैनंदिन मूळ कामावर परिणाम होणार नाही याची दक्षता घेण्याच्या अटीवर शैक्षणिक संस्थानी संबंधित कर्मचाऱ्यांना शिक्षण घेण्यासाठी परवानगी देणेबाबत सूचना निर्गमित कराव्यात असे कळविण्यात आले आहे.

त्यानुषंगाने मा. आमदार सुधाकर आडबाले, विधान परिषद सदस्य, यांचे पत्र दि. दि.18.5.2025 मधील मुद्दे विचारात घेवून प्रचलित शासन नियम व धोरणानुसार उचित कार्यवाही करावी.

Signed by Parag
Purushottam Masram
Date: 05-11-2025 16:20:46

(डॉ.पराग मसराम)
सहसंचालक, उच्च शिक्षण
जळगांव विभाग जळगांव

महाराष्ट्र विधान परिषद

**आमदार सुधाकर अडबाले**
विधान परिषद सदस्य
नागपूर विभाग शिक्षक मतदार संघ


दि. १८/०५/२०२५

जावक क्र. ११९८/२०२५

अ.मु.स.
उच्च व तंत्र शिक्षण
यांचे कार्यालय
क्र. 8390381
दि. 23/05/25

प्रति,

मा. ना. चंद्रकांत दादा पाटील,
उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, मंत्रालय, मुंबई - ३२

विषय :- अनुदानित खाजगी शाळा व महाविद्यालयातील सेवेतील कार्यरत शिक्षकेतर कर्मचारी यांना उच्च शिक्षण घेण्याकरीता सर्व विद्यापीठ व शैक्षणिक संस्था प्रमुखांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ अन्वये कार्यवाही बंधनकारक करण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपण नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) - २०२० मध्ये पदार्पण करीत NEP च्या अंमलबजावणीबाबत नियोजन करीत मार्गक्रमण करीत असतांना देशाच्या प्रगतीसाठी कुशल मनुष्यबळ निर्माण करणे, हे प्रमुख उदिष्टे ठेवून शाश्वत विकास घडविता येतो. कोणताही मनुष्य शासकीय/निमशासकीय सेवेत कमीत कमी त्याच्या पदानुसार शैक्षणिक अहर्ता निश्चित केलेली असते. त्यानंतर सदर कर्मचारी आपले नियमित कार्य सांभाळून आपला शैक्षणिक स्तर वाढविण्याचा विचार करतो. त्याकरीता राज्य शासनाने महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) अधिनियम १९७७ आणि महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ यातील नियम 'अ' व 'ब' सर्व शासकीय/निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांना लागू होते. सदर नियमात उच्च शिक्षण घेण्याबाबत निकष व पध्दत विषद केली आहे. त्यामुळे कोणत्याही अधिकारी/कर्मचाऱ्याला/शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांना आपली शैक्षणिक पात्रता वाढविण्याचा पूर्ण अधिकार प्रदान करण्यात आलेला आहे. तथापि अशा प्रकरणी शैक्षणिक पात्रता वाढवितांना आपल्या कार्यालयप्रमुखाची परवानगी घेतली पाहिजे अथवा सदर कर्मचारी यांनी तशी इच्छा कळविणे आवश्यक आहे, असे स्पष्ट नमुद आहे. अशा प्रकरणी संबंधित कर्मचारी जर आपल्या दैनंदिन कामावर कुठलाही परिणाम पडू देत नसल्यास त्यास शाळा प्रमुखाची कुठलीही अडचण न राहता तातडीने तो अर्ज मंजूर करणे किंवा NOC देणे क्रमप्राप्त आहे.

परंतु, काही शैक्षणिक संस्था याचे पालन करीत नसल्याने अनेक शाळा - महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी उच्च शिक्षण घेणे पासून वंचित ठेवत आहे, ही गंभीर बाब आहे. सेवेतील कर्मचारी यांना त्यांची शैक्षणिक पात्रता वाढविली तर त्यांच्या ज्ञानात भर पडून कुशल मनुष्यबळ निर्माण होण्यास मदत होणार आहे. आमचे कर्मचारी Ph.D. प्रवेशपूर्व परिक्षा कित्येक वर्षापासून उत्तीर्ण असूनही अनेक शैक्षणिक संस्था ना हरकत प्रमाणपत्र तथा परवानगी देत नसल्याने अनेक उमेदवार आपले संशोधनात्मक अभ्यासकार्य करू शकले नाही याची खंत वाटते.

करीता आपण तातडीने शासनस्तरावरून राज्यातील सर्व विद्यापीठांना व शैक्षणिक संस्थांना कळवून महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ अन्वये कार्यवाही करण्यात यावी, असे आपण संबंधितांना आदेश देण्यात यावे, ही विनंती!

D.S.(C.E.)

आ. सुधाकर अडबाले
विधान परिषद सदस्य (म.रा.)

प्रतिलिपी,
मा. अतिरीक्त मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

DS(उ)/16


चंद्रपूर कार्यालय : आमदार सुधाकर गोविंदराव अडबाले, श्रीकृपा कॉलनी, जगन्नाथ बाबा नगर, दाताळा रोड, चंद्रपूर, जि. चंद्रपूर - 442 401 ☐ 9850569216
सरकार्यवाह, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ
नागपूर कार्यालय : लक्ष्मी विहार कॉम्प्लेक्स, बँक ऑफ महाराष्ट्र समोर, मेट्रो पिल्लर नं. 54 जवळ, सोमलवाडा, नागपूर - 440 025 ☐ 8275785112
sgadbale@gmail.com ☐ 9850323845